# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः16.03.2025** **वारःरविवार**

---

**ठळक बातम्या**

1 ) गेल्या 10 वर्षांपासून ईशान्येकडील सर्व राज्यांचा सामुहिक विकास करून त्यांना जास्त मजबूत करण्यासाठी, केंद्रसरकार सतत प्रयत्नशील- केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच प्रतिपादन

2 ) येत्या 2 वर्षात देशात 4 स्वदेशी चिप निर्मिती होणार – केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांची घोषणा

3 ) तेलंगणामध्ये बंदी घातलेल्या संघटनेच्या 64 माओवाद्यांच आत्मसमर्पण

4 ) अमेरिकेच्या मध्य आणि दक्षिण भागात झालेल्या वादळामुळे 19 जणांचा मृत्यू

आणि

5 ) देशभरात विविध ठिकाणी आज तीव्र उष्णतेच्या लाटेची शक्यता

**अमित शहा**

केंद्र सरकार गेल्या 10 वर्षा पासून ईशान्येकडील सर्व राज्यांच्या सामुहिक विकास करून त्यांना जास्त मजबूत करण्यासाठी सतत प्रयत्नशील आहे, यामध्ये पर्यंतणापासून उद्योग विकास आणि खेळापासून अंतराळ संशोधन अशा सर्व क्षेत्रांचा समावेश आहे अस प्रतिपादन केंद्रीय गृह मंत्री अमित शहा यांनी केल. मिझोरममधल्या झोखावसंग इथ आसाम रायफल्सच्या मुख्यालयाच स्थानांतरण काल शहा यांच्या हस्ते करण्यात आल त्यावेळी ते बोलत होते. देशाचा ईशान्य प्रदेश इतर भागांशी जोडून विकास, शांतता आणि सलोखा प्रस्थापित करण्याला केंद्र सरकारचं प्राधान्य असल्याचं अमित शाह यांनी यावेळी सांगितलं. तसच गेली अनेक वर्ष प्रलंबित असलेलं हे स्थानांतर राजधानी ऐझवालमधून झोखावसंग या ठिकाणी करण्यात आल्याने राज्याच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण पाऊल असल्याचं ते म्हणाले. गेल्या दहा वर्षात आसाममधले दहा हजारपेक्षा जास्त युवक शस्त्र टाकून मुख्य प्रवाहात आले असून आसाम प्रगतीपथावर आहे, असं गृहमंत्री अमित शाह यांनी काल दुसऱ्या एका कार्यक्रमात सांगितल गोलघाट जिल्ह्यातल्या डेरगाव इथल्या पोलीस अकॅडमीच्या पहिल्या टप्प्याचं उद्घाटन काल शाह यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. पुढच्या टप्प्याची पायाभरणीही त्यांनी यावेळी केली. ही अकॅडमी देशातली सर्वश्रेष्ठ अकॅडमी होईल असा विश्वास शहा यांनी यावेळी व्यक्त केला.

**अश्विनी वैष्णव**

भारतात यावर्षी पहिली स्वदेशी चिप जारी करण्यात येईल आणि येत्या 2 वर्षात अशा 4 स्वदेशी चिप बाजारात येतील, त्यामुळे भारत टेस्ला, फोक्सवॅगन सह जगातील कुठल्याही कंपन्याना त्याची निर्यात करू शकेल, असा विश्वास केंद्रीय इलेक्ट्रॉनिक आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी व्यक्त केला. तामिळनाडू तील चेन्नई इथल्या आय आय टी संस्थेतील विद्यार्थ्यांशी त्यांनी काल संवाद साधला त्यावेळी ते बोलत होते. भारतात सध्या 5

सेमी कंडक्टर कंपन्या कां करत असल्याची माहिती टीआणि यावेळी दिली . भारतात कृषि क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञान लाभदायक ठरत असून , केंद्र सरकारने ए आय तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी 10 हजार कोटी रुपयांच अनुदान दिल आहे अस ही त्यांनी सांगितल

विद्यार्थ्यांची निर्मिती असलेल्या स्टार्टअपला सरकार भरीव सहकार्य करेल, असं आश्वासन अश्विनी वैष्णव यांनी दिलं. हायपरलूप प्रकल्पाच्या उभारणीत तामिळनाडूच्या थैयूर इथल्या भारतीय प्रौद्योगिकी संस्थेतल्या विद्यार्थ्यांचा सहभाग आहे. या विद्यार्थांशी वैष्णव यांनी काल संवाद साधलाविद्यार्थ्यांनी नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान विकसित करण्यावर लक्ष केंद्रीत करावं, असं आवाहनही त्यांनी केलं. इलेक्ट्रॉनिक वस्तूंच्या निर्यातीत तामिळनाडू राज्य देशात दुसऱ्या स्थानावर असल्याचं सांगत त्यासाठी राज्य सरकारच्या धोरणांचं वैष्णव यांनी यावेळी कौतुक केलं.

**आत्म समर्पण**

तेलंगणा मध्ये बंदी घातलेल्या भारतीय कम्युनिस्ट पार्टी- माओवादी या संघटनेच्या 64 सदस्यांनी काल भद्रादि कोठागुडम जिल्ह्यात पोलिसांसमोर आत्मसमर्पण केलं. यावेळी पोलिस महानिरीक्षक चंद्र शेखर रेड्डी आणि जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक रोहित राज यांच्या समोर टीआणि हे आत्मसमर्पण केल यात 48 पुरुष तर 16 महिला माओवाद्यांचा समावेश आहे. यामुळे गेल्या दोन महिन्यात आत्मसमर्पण केलेल्या माओवाद्यांची संख्या 122 वर पोहोचली आहे. आत्मसमर्पण केलेल्या माओ वाद्यांना तत्काल 25 हजारांची मदत देण्यात येत असल्याच पोलिस महानिरीक्षक चंद्र शेखर रेड्डी यांनी यावेळी सांगितल.

**स्फोटके**

महाराष्ट्रात गडचिरोली जिल्ह्यात भामरागड तालुक्यातल्या कवंडे जंगलात नक्षलवाद्यांनी जमिनीत पुरुन ठेवलेली स्फोटकं शोधून काढण्यात पोलिसांना काल यश आलं. यामुळे घातपात करण्याचा नक्षल्यांचा डाव फसला. कवंडे पोलिस ठाण्यातले विशेष अभियान पथकाचे जवान नक्षलविरोधी अभियान राबवत असताना ही कारवाई करण्यात आली.

**पीयूष गोयल**

पात्र झोपडपट्टीधारकांना हक्काची घरे मिळावीत, यासाठी एकही नवीन झोपडपट्टी उभारली जाता कामा नये, तसंच अनधिकृत बांधकामांवर कठोर कारवाई केली जावी, असं केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांनी म्हटलं आहे. मुंबईत काल महात्मा फुले नगर इथल्या 91 झोपडपट्टीधारकांना सदनिकांचे वाटप करण्यात आलं. त्यावेळी ते बोलत होते. झोपडपट्टी पुनर्वसनाची प्रक्रिया गतीमान होण्यासाठी अधिकाऱ्यांनी प्रामाणिकपणे काम करावे. तसेच, बाहेरचा कोणी या भागात येणार नाही आणि इथल्या रहिवाशांना अन्यायाने बाहेर फेकले जाणार नाही, याची खबरदारी अधिकाऱ्यांनी आणि झोपडपट्टीधारकांनी घ्यावी असं गोयल यांनी सांगितलं.

**गडकरी**

औषध निर्माण शाखेच्या विद्यार्थ्यांनी, विद्वत्ता आत्मसात करण्यासोबतच उद्यमशीलतेची कास धरून नोकरी देणारे, तसेच रोजगार निर्माते व्हावं आणि विदर्भाच्या आर्थिक विकासात योगदान द्यावं असं केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी

म्हटलं आहे. नागपूरच्या लोणारा इथल्या सेंट्रल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीच्या पदवीप्रदान सोहळा कार्यक्रमात ते बोलत होते.

**फिट इंडिया**

केंद्रीय क्रीडा आणि युवक कल्याण मंत्री डॉक्टर मनसुख मांडवीय  यांच्या हस्ते आज नवी दिल्लीत फिट इंडिया महोत्सवाचे उद्घाटन होणार आहे.  निरोगी आणि लठ्ठपणा मुक्त राष्ट्राच्या दृष्टिकोनातून सक्रिय जीवनशैलीला प्रोत्साहन देण,  हे या महोत्सवाचे उद्दिष्ट आहे. कार्यक्रमादरम्यान येत्या 20 तारखेपासून नवी दिल्लीत सुरू होत असलेल्या खेलो इंडिया च्या बोधचिन्ह आणि गीताच अनावरण देखील  यावेळी करण्यात येणार आहे.

**ऊस उत्पादन कार्यशाळा**

कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात एआय तंत्रज्ञानाच्या मदतीने, ऊस शेतीत नवी क्रांती होत असून कमी खर्चात अधिक उत्पादन देणारं हे संशोधन देशाच्या कृषी क्षेत्रात मैलाचा दगड ठरेल, असा विश्वास ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी व्यक्त केला. वेस्ट इंडियन शुगर मिल्स असोसिएशन आणि ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट बारामती यांच्या वतीनं  आयोजित कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी ते काल बोलत होते. या कार्यशाळेत महाराष्ट्रातल्या 102 साखर कारखान्यांनी सहभाग घेतला आहे.

**पद्म नामांकन**

प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून जाहीर होणाऱ्या पद्म पुरस्कार-2026 च्या नामांकनांना काल पासून सुरुवात झाली असून  नामांकनाची शेवटची तारीख 31 जुलै आहे. पुरस्कारांसाठीची नामांकने आणि शिफारशी केवळ राष्ट्रीय पुरस्कार पोर्टलवर ऑनलाइन प्राप्त केल्या जाणार असून डॉक्टर आणि शास्त्रज्ञ वगळता, सार्वजनिक उपक्रमांमध्ये काम करणारे सरकारी कर्मचारी या पद्म पुरस्कारांसाठी पात्र नाहीत.

**वादळ**

अमेरिकेच्या मध्य आणि दक्षिण भागात झालेल्या वादळामुळे 19 जणांचा मृत्यू झाला असून अनेक घर तसंच वाहनांचं नुकसान झालं आहे. रात्रभर या वादळाचा तडाखा बसल्याने, मिसौरीत सर्वाधिक 11 जणांचा मृत्यू झाला असून 29 जण जखमी झाले आहेत. देशभर पसरलेल्या या प्रचंड वादळामुळे शंभरहून अधिक ठिकाणी वणवे  लागले असून कॅनडाच्या सीमेवरून टेक्सास पर्यंत ताशी 130 किलोमीटर वेगाने वारे वाहण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

**हॉकी पुरस्कार**

हॉकी इंडिया तर्फे देण्यात  येणाऱ्या 7 व्या वार्षिक  पुरस्कारांच वितरण काल नवी दिल्लीत करण्यात आल. यावेळी पॅरिस ऑलिंपिक कांस्य पदक विजेता  भारतीय हॉकी संघाचा कर्णधार हरमन प्रीतसिंह याला 2024 सालचा सर्वश्रेष्ठ पुरुष खेळाडूचा  सन्मान देण्यात आला तर भारतीय महिला हॉकी  गोलकीपर  सविता हिला बलबीर सिह ज्येष्ठ खेळाडू पुरस्काराने यावेळी सन्मानित करण्यात आल. यावेळी 50 वर्षापूर्वी 15 मार्च रोजी क्वाललांपूर इथ भारताला हॉकीचा एकमेव विश्वचषक जिंकून देणाऱ्या अजितपाल सिंह यांच्या नेतृत्वाखालील संघाला यावेळी ध्यानचंद

जीवनगौरव पुरस्काराने गौरवण्यात आल. माजी केंद्रीय क्रीडा मंत्री किरेन रिजिजू , हॉकी इंडियाचे अध्यक्ष दिलीप तिरके , सचिव भोलानाथ सिंग हे यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

**हवामान**

देशभरात विविध ठिकाणी आज तीव्र  उष्णतेच्या लाटेची  शक्यता भारतीय  हवामान विभागाने वर्तवली आहे. विदर्भ, छत्तीसगड, झारखंड, उत्तर तेलंगणामध्ये आज तर पश्चिम बंगालच्या गंगायन प्रदेश, तसंच सौराष्ट्र आणि कच्छमध्ये पुढील दोन दिवसात उष्णतेच्या लाटेची शक्यता आहे. ओडिशा मध्ये आज उष्णतेच्या लाटेची गंभीर शक्यता वर्तवण्यात आली असून झारखंड आणि पश्चिम बंगाल साठी पुढील दोन दिवसांकरिता उष्णतेचा पिवळा बावटा जारी करण्यात आला आहे. उत्तराखंड मध्ये आज तर अरुणाचल प्रदेश मध्ये पुढील दोन दिवसात मुसळधार पावसाची ही शक्यता वर्तवण्यात आली आहे.

**याबरोबरच  हे  राष्ट्रीय बातमीपत्र संपल , नमस्कार**